0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :-

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.२०/१०/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७६/२०११/जा.८६३, दि. ०१/११/२०११ व ०९/११/२०११.
३) मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा. लि. यांचे दि.२२/११/२०११ रोजीचे निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७६/२०११/जा. १०२२
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २० /१२/२०११.

### आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अवये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २७/०९/२०११ रोजी मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा. लि. प्लॉट नं. ४९, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, रबाळे, नवी मुंबई येथे या कार्यालयातील उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांच्या पथक व पंचांसमवेत भेट दिली असता, कंपनीच्या आवारात ट्रक क्र. एमएच-०४-सीजी-९७९ हा उभा असल्याचे दिसून आले. सदर ट्रकमधील ड्रायव्हर सुरेशसिंग यांनी पथकास ट्रकवरील कंटेनरचा दरवाजा उघडून दाखविला असता त्यामध्ये गव्हाच्या गोण्या आढळून आल्या. त्यातील काही गोण्या कंपनीच्या व्यवस्थापक यांच्यासमक्ष कामगारांच्या मदतीने उघडून खाली करण्यात आल्या व त्यापैकी ३ रिकाम्या गोण्या पलटी करुन पाहिल्या असता, त्यावर २००८/२००९ यावर्षीचा शिक्का असलेला असा उल्लेख असलेल्या व त्यावर भारतीय खाद्य निगमचा शिक्का असल्याचे आढळले. ट्रकचे ड्रायव्हर याचेकडे ट्रकमधील गहू कोठून आणला याबाबत विचारणा केली असता, त्यांनी सदरचा गव्हाचा साठा मे. महेश्वरी ट्रेडर्स, नरोडा, अहमदाबाद येथून आणल्याचे सांगितले. याबाबत अधिक चौकशी केली असता सदरचे ट्रक त्यांनी दिनांक २३.९.२०११ रोजी न्हावाशेवा, उरण येथून प्लास्टिक ण्शिवीत केमिकल घेऊन अहमदाबाद येथे गेले होते व दिनांक २५.९.२०११ रोजी सदरचा ट्रक रिकामा करुन त्यांनी दिनांक २६.९.२०११ रोजी एकूण १८,७०५ किलो म्हणजेच १८५ गोणी गव्हाचा अहमदाबाद येथील श्री. महेश्वरी ट्रेडर्स यांचेकडून साठा भरुन तो

दिनांक २७.९.२०११ रोजी मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा. लि., प्लॉट नं. ४९, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, रबाळे, नवी मुंबई या ठिकाणी घेऊन आल्याचे सांगितले.

अधिकाऱ्यांनी सदरचे ट्रक ड्रायव्हरकडे ड्रायव्हिंग लायसन्स व गाडीचे नोंदणीचे कागदपत्र याबाबत विचारणा केली असता ते पोलीसांनी ताब्यात घेतल्याचे सांगून व त्याबाबतची पावतीही उपलब्ध नसल्याचे सांगितले. तद्नंतर अहमदाबाद ते नवी मुंबई या प्रवासात भरलेले टोलच्या पावत्यांबाबत विचारणा केली असता तेही ड्रायव्हरकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले.

तद्नंतर सदर ड्रायव्हरला मिलच्या कार्यालयात येण्याच्या सूचना देऊन मे. महेश्वरी ट्रेडर्स यांचे दि. २३.९.२०११ रोजीचे बिल क्र. ३८३ व त्यावरील नमूद गव्हाचा साठा १८५ गोण्या (१८७०५ किलो) त्याला दाखवून त्याच्या निर्दशनास आणून दिले असता, त्यांनी सदरचा साठा दि. २६.९.२०११ रोजी भरला असल्याचे सांगितले. परंतु पावतीवरील तारीख, त्यासोबतची पत्रे तसेच गुजरात राज्याचे वॅटबाबतचे पत्र यासर्वांवर दि. २३.९.२०११ असा उल्लेख असून याबाबत तारखांबाबत तफावत का ? असे विचारले असता त्याने याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगितले. सदरचा ट्रक कोणाच्या मालकीचा असल्याचे विचारले असता त्याने प्रथम मे. आयटीसी ट्रान्सपोर्ट कंपनी, गोकूळ बिल्डींग, मस्जीद बंदर असे सांगून त्यानंतर सदर ट्रकचे मालक लवकुश पांडे नामे व्यक्ति असून ते कल्याण येथे रहात असल्याचे सांगितले. यापूर्वी सदर मिलमध्ये आले होते का? याबाबत ड्रायव्हरकडे विचारणा केली असता त्यांनी यापूर्वी एकदा आल्याचे सांगितले. तसा याबाबतचा लेखी जबाब पंचासमक्ष नोंदवून घेण्यात आला आहे.

फ्लोअर मिलच्या कार्यालयातील व्यवस्थापक यांना मिलर परवान्याबाबत विचारणा केली असता त्यांनी सादर केलेल्या " महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसन्सिग ऑर्डर १९९८ " अन्वये निर्गमित केलेले परवाना क्र. CR/F REG/COMPOSITE LICENSE/21 (WH)/MILLER-WHEAT दिनांक ३१.१२.२०१३ पर्यंत विधीग्राहय असल्याचे आढळले.

मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा. लि. चे व्यवस्थापक रामप्रकाश विजयप्रकाश विजयवर्गीय यांचेसमक्ष फ्लोअर मिलमधील गव्हाच्या साठयाची पाहणी करुन मोजदाद केली असता एकूण १३१६० क्विंटल गव्हाचा प्रत्यक्ष साठा आढळून आला. तद्नंतर फ्लोअर मिलमधील साठा पुस्तक ताडून पाहिले असता दिनांक २७.९.२०११ रोजी गव्हाची सुरुवातीची शिल्लक ११५८३ क्विंटल व त्यादिवशी सकाळपासून कंपनीमध्ये आवक झालेल्या ५ ट्रकमधील ८०९ क्विंटल गहू असा मिळून एकूण १२३९२ क्विंटल गव्हाचा पुस्तकी साठा आढळला. त्यामधून मिलींग झालेला ८८२ क्विंटल गव्हाचा साठा वजा जाता ११५१० क्विंटल गव्हाचा साठा शिल्लक राहणे अपेक्षित होते. परंतु पंच व मिलचे व्यवस्थापक यांचेसमक्ष मोजदाद केल्यानंतर मिलमध्ये प्रत्यक्ष साठा १३१६० क्विंटल आढळून आला. सदर

प्रत्यक्ष सांठ्यातून साठेपुस्तकातील नमूद प्रत्यक्ष शिल्लक ११५१० क्विंटल साठा वजा जाता एकूण १६५० क्विंटल गव्हाचा अतिरिक्त साठा आढळून आला. याबाबत व्यवस्थापक रामप्रकाश विजयप्रकाश विजयवर्गीय यांचा लेखी जबाब नोंदविण्यात आलेला आहे.

उपरोक्त तपासणीमध्ये ट्रक क्र. एमएच-०४-सीजी-९७९ हा ट्रक व त्यामधील १८५ गोणी गव्हाचा साठा तसेच मिलच्या तपासणीमधील अतिरिक्त आढळलेला १६५० क्विंटल गव्हाचा साठा हा सदर तपासणीच्या अधिन राहून पुढील आदेशापर्यंत जतन करण्याबाबत सूचना देऊन तसा सुपुर्दनामा करुन मिलचे व्यवस्थापक रामप्रकाश विजयप्रकाश विजयवर्गीय यांचे ताब्यात देण्यात आलेला आहे.

सबब, दि महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसन्सिंग ऑर्डर १९९८ चे कलम १५ (सी) मधील तरतुदीनुसार सदरचा अतिरिक्त आढळलेला १६५० क्विंटल गव्हाचा साठा जप्त करण्यात आला.

प्रस्तूत प्रकरणी क्र. निशि/फिप/२०११/प्र.क्र.२१३/जा.१४९ दिनांक २९/०९/२०११ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून दिनांक ११/१०/२०११ रोजी ठेवण्यात आलेल्या सुनावणीस मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा. लि. यांचे वतीने वकालतनामा घेऊन उपस्थित असलेले ॲड. के. एच. पारेख यांनी सादर केलेल्या लेखी निवेदना सोबत जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-सीजी-९७९ मधील गव्हाच्या साठ्याबाबतचे मे. महेश्वरी ट्रेडर्स, नरोडा, अहमदाबाद यांचे दिनांक २३/०९/२०११ रोजीचे बिल क्र. ३८३ सादर केले व त्यासोबत सादर केलेल्या इतर दस्ताऐवजांचे तसेच मे. महेश्वरी ट्रेडर्सचे मालक यांनी सादर केलेल्या लेखी निवेदन व त्यासोबतचे कागदपत्रांचे अवलोकन करुन या कार्यालयाचे आदेश क्र. निशि/फिप/२०११/प्र.क्र.२१३/जा.१६६ दिनांक १९/१०/२०११ अन्वये टेलर क्र. एमएच-०४-सीजी-९७९ व त्यामधील १८५ गोणी गव्हाचा साठा पुढील तपासाच्या अधिन राहून मुक्त करण्यात आला.

परंतु दिनांक २७/०९/२०११ रोजी घेण्यात आलेल्या तपासणीमध्ये आढळून आलेल्या १६५० क्विंटल गव्हाच्या अतिरिक्त साठ्याबाबत सुनावणीचे वेळेस मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा. लि. यांचे वतीने सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये नमूद केलेले कारण हे समाधानकारक नसून दि महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसन्सिंग ऑर्डर १९९८ मधील आदेश व त्यानुसार त्यांना देण्यात आलेल्या परवान्यामधील अटी / शर्तीचा भंग करण्याऱ्या आहेत. तसेच तपासणीमध्ये आढळून आलेल्या अतिरिक्त साठ्याचे खरेदी बिलेही ते सादर करु शकले नसल्याने सदरचा अतिरिक्त साठा हा बेकायदेशिररित्या व गैरमार्गाने साठवणूक केले असल्याचे सकृतदर्शनी दिसून आले.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी वरील वाचावे क्र.१ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली

आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. ०८/११/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०८/११/२०११ रोजीच्या सुनावणी प्रशासकिय कारणास्तव रद्द करण्यात येऊन पुढील सुनावणी दि.२२/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २२/११/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. मेरिडियन फ्लोअर मिलच्या वतीने ॲड. श्री. किर्ती पारेख हे उपस्थित राहून त्यांनी मे. मेरिडियन फ्लोअर मिलच्या वतीने लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस मे. मेरिडियन फ्लोअर मिलचे व्यवस्थापक रामप्रकाश विजयप्रकाश विजयवर्गीय व संचालक श्री. महेश कुमार पारीख हे उपस्थित होते.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

मे. मेरिडियन फ्लोअर मिल यांच्या वतीने सादर केलेल्या लेखी निवेदनात, त्यांच्या कंपनीच्या नावे दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर, १९९८ अन्वये त्यांच्याकडे नमूद पत्त्यावर मिलरसाठी देण्यात आलेला परवाना क्र. २१(घा) दि.३१/१२/२०११ अखेर वैध असल्याचे मान्य केले. तपासणीच्या वेळेस शिधावाटप विभागाच्या वतीने गव्हाची मोजदाद केल्यानंतर आढळून आलेला १३१६० क्विंटल साठा त्यांनी मान्य नसल्याचे सांगून कंपनीच्या आवारात १३४२९ गव्हाच्या गोण्या असल्याचे नमूद करुन उपस्थित अधिकाऱ्यांनी सदर गव्हाच्या गोण्यांचे वजन न करता त्यास प्रति गोणी ९८ किलो प्रमाणे बेरीज करुन १३१६० क्विंटल गव्हाचा साठा असल्याचे पंचनाम्यात नमूद केले आहे. तथापी, प्रति गोणी गव्हाचे वजन सुमारे ९३ ते ९५ किलो असते. त्यानुसार कंपनीच्या आवारात असलेल्या प्रत्येक गोण्यांचे वजन केल्यास गव्हाचा एकूण साठा १३१६० क्विंटल पेक्षा कमी आढळून आला असता. परंतू उपस्थित अधिकाऱ्यांनी नमूद केलेला एकूण साठ्याच्या अनुषंगाने त्यांनी कंपनीच्या आवारात असलेल्या प्रत्येक गोण्यांचे अधिकारी व कंपनीचे प्रतिनिधी यांच्या समक्ष पुन्हा वजन करण्याची विनंती केली आहे. कंपनीमध्ये उत्पादनाच्या वेळी होणाऱ्या प्रक्रीयेत (Processing) गव्हाच्या साठ्याचे वजन दीड टक्का वाढत असल्याचे नमूद करुन या नुसार गव्हाच्या साठ्याची बेरीज केली तर पुस्तकी शिल्लक व प्रत्यक्ष शिल्लक यामध्ये फरक आढळून येणार नसल्याचे नमूद करुन सदर गव्हाचा साठा १३१६० क्विंटल ऐवजी ११५१०

क्विंटल गव्हाचा साठा आढळून येईल असे नमूद केले आहे. तसेच दीड टक्का वाढीव वजनाचे साठा पुस्तकात नोंद घेतल्याचे नमूद केले आहे. याप्रकारे साठापुस्तकात नोंद असलेला साठा व प्रत्यक्षात असलेला साठा यामध्ये फरक नसल्याचे सांगून तसे त्यांनी कोणत्याही अटी/शर्तींचा भंग न केल्याने सदरचे अतिरिक्त गव्हाच्या साठ्याचे खरेदी बिले सादर करण्याचे प्रश्न उद्‌भवत नसल्याचे सांगितले. जीआर क्र. ८८० ई दि.३०/०३/२००९ अन्वये केंद्र तसेच राज्य शासनाने गव्हावरचे निर्बंध काढले असल्याचे सांगून सदर साठ्याच्या व्यवहाराशी संबंधित तसेच मिलिंगकरिता परवान्याची आवश्यकता नसल्याने परवान्याच्या अटींचे पालन करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये आदेशाचा भंग झाला असल्यास जीवनावश्यक वस्तूंचा साठा जप्त करण्याचे तरतूद असून त्यांचा जप्त करण्यात आलेला गव्हाच्या साठ्यावर निर्बंध नसल्याने व नियंत्रित वस्तू नसल्याने सदर साठा जप्त करण्याचा प्रश्न उद्‌भवत नसल्यचे सांगून त्यांचा जप्त करण्यात आलेला १६५० क्विंटल गव्हाचा साठा परत मिळण्याची विनंती करुन तसे नमूद केले आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी, साठा मालक यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दि.२७/०९/२०११ रोजी मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा. लि. प्लॉट नं. ४९, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, रबाळे, नवी मुंबई येथे या कार्यालयातील उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांच्या पथक व पंचांसमवेत भेट देवून तपासणी केली असता, कंपनीच्या आवारात ट्रक क्र. एमएच-०४-सीजी-९७९ हा उभा असल्याचे दिसून आले. सदर ट्रकमधील ड्रायव्हर सुरेशसिंग यांनी पथकास ट्रकवरील कंटेनरचा दरवाजा उघडून दाखविले असता त्यामध्ये गव्हाच्या गोण्या आढळून आल्या. त्यातील काही गोण्या कंपनीच्या व्यवस्थापक यांच्या समक्ष कामगारांच्या मदतीने उघडून खाली करण्यात आल्या व त्यापैकी ३ रिकाम्या गोण्या पलटी करुन पाहिल्या असता, त्यावर २००८/२००९ यावर्षीचा शिक्का असलेला असा उल्लेख असलेल्या व त्यावर भारतीय खाद्य निगमचा शिक्का असल्याचे आढळले. ट्रकचे ड्रायव्हर याचेकडे ट्रकमधील गहू कोठून आणला याबाबत विचारणा केली असता, त्यांनी सदरचा गव्हाचा साठा मे. महेश्वरी ट्रेडर्स, नरोडा, अहमदाबाद येथून आणल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सदरचे ट्रक ड्रायव्हरकडे ड्रायव्हिंग लायसंन्स व गाडीचे नोंदणीचे कागदपत्र याबाबत विचारणा केली असता ते पोलीसांनी ताब्यात घेतल्याचे सांगून व त्याबाबतची पावतीही उपलब्ध नसल्याचे सांगितले. तद्‌नंतर

अहमदाबाद ते नवी मुंबई या प्रवासात भरलेले टोलच्या पावत्यांबाबत विचारणा केली असता तेही ड्रायव्हरकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. तसा याबाबतचा लेखी जबाब पंचासमक्ष नोंदवून घेण्यात आला आहे.

मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा.लि. चे व्यवस्थापक रामप्रकाश विजयप्रकाश विजयवर्गीय यांचेसमक्ष फ्लोअर मिलमधील गव्हाच्या साठयाची पाहणी करुन मोजदाद केली असता एकूण १३१६० क्विंटल गव्हाचा प्रत्यक्ष साठा आढळून आला. फ्लोअर मिलच्या कार्यालयातील व्यवस्थापक यांना मिलर परवान्याबाबत विचारणा केली असता त्यांनी " महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसन्सिंग ऑर्डर १९९८ " अन्वये निर्गमित केलेले परवाना क्र. CR/F REG/COMPOSITE LICENSE/21 (WH)/MILLER-WHEAT दि.३१.१२.२०११ पर्यंत विधीग्राहय असल्याचे सादर केले. तद्नंतर फ्लोअर मिलमधील साठा पुस्तक तांडून पाहिले असता दि.२७.९.२०११ रोजी गव्हाची सुरुवातीची शिल्लक ११५८३ क्विंटल व त्यादिवशी सकाळपासून कंपनीमध्ये आवक झालेल्या ५ ट्रकमधील ८०९ क्विंटल गहू असा मिळून एकूण १२३९२ क्विंटल गव्हाचा पुस्तकी साठा आढळला. त्यामधून मिलींग झालेला ८८२ क्विंटल गव्हाचा साठा वजा जाता ११५१० क्विंटल गव्हाचा साठा शिल्लक राहणे अपेक्षित होते. परंतु पंच व मिलचे व्यवस्थापक यांचेसमक्ष मोजदाद केल्यानंतर मिलमध्ये प्रत्यक्ष गव्हाचा साठा १३१६० क्विंटल आढळून आला. सदर प्रत्यक्ष साठ्यातून साठेपुस्तकातील नमूद प्रत्यक्ष शिल्लक ११५१० क्विंटल साठा वजा जाता एकूण १६५० क्विंटल गव्हाचा अतिरिक्त साठा आढळून आला. याबाबत व्यवस्थापक रामप्रकाश विजयप्रकाश विजयवर्गीय यांचा लेखी जबाब नोंदविण्यात आलेला आहे.

सदर तपासणीमध्ये ट्रक क्र. एमएच-०४-सीजी-९७९ हा ट्रक व त्यामधील १८५ गोणी गव्हाचा साठा तसेच मिलच्या तपासणीमधील अतिरिक्त आढळलेला १६५० क्विंटल गव्हाचा साठा हा सदर तपासणीच्या अधिन राहून पुढील आदेशापर्यंत जतन करण्याबाबत सूचना देऊन तसा सुपुर्दनामा करुन मिलचे व्यवस्थापक रामप्रकाश विजयप्रकाश विजयवर्गीय यांचे ताब्यात देण्यात आलेला आहे.

प्रस्तूत प्रकरणी क्र. निशि/फिप/२०११/प्र.क्र.२१३/जा.१४९ दिनांक २९/०९/२०११ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून दिनांक ११/१०/२०११ रोजी ठेवण्यात आलेल्या सुनावणीस मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा. लि. यांचे वतीने वकालतनामा घेऊन उपस्थित असलेले ॲड. के. एच. पारेख यांनी सादर केलेल्या लेखी निवेदना सोबत जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-सीजी-९७९ मधील गव्हाच्या साठ्याबाबतचे मे. महेश्वरी ट्रेडर्स, नरोडा, अहमदाबाद यांचे दिनांक २३/०९/२०११ रोजीचे बिल क्र. ३८३ सादर केले व त्यासोबत सादर केलेल्या इतर दस्ताऐवजांचे तसेच मे. महेश्वरी ट्रेडर्सचे मालक यांनी सादर केलेल्या लेखी निवेदन व त्यासोबतचे कागदपत्रांचे

अवलोकन करुन या कार्यालयाचे आदेश क्र. निशि/फिप/२०११/प्र.क्र.२१३/जा.१६६ दिनांक १९/१०/२०११ अन्वये ट्रेलर क्र. एमएच-०४-सीजी-९७९ व त्यामधील १८५ गोणी गव्हाचा साठा पुढील तपासाच्या अधिन राहून मुक्त करण्यात आला.

मे. मेरिडियन फ्लोअर मिल यांनी सादर केलेल्या खुलाशात, त्यांच्या कंपनीच्या नावे दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर, १९९८ अन्वये त्यांच्याकडे नमूद पत्त्यावर मिलरसाठी देण्यात आलेला परवाना क्र. २१(घा) दि.३१/१२/२०११ अखेर वैध असल्याचे मान्य केले. तपासणीच्या वेळेस शिधावाटप विभागाच्या वतीने गव्हाची मोजदाद केल्यानंतर आढळून आलेला १३१६० क्विंटल साठा त्यांना मान्य नसल्याचे सांगून कंपनीच्या आवारात १३४२९ गव्हाच्या गोण्या असल्याचे नमूद करुन उपस्थित अधिकाऱ्यांनी सदर गव्हाच्या गोण्यांचे वजन न करता त्यास प्रति गोणी ९८ किलो प्रमाणे बेरीज करुन १३१६० क्विंटल गव्हाचा साठा असल्याचे पंचनाम्यात नमूद केले आहे. तथापी, प्रति गोणी गव्हाचे वजन सुमारे ९३ ते ९५ किलो असते. त्यानुसार कंपनीच्या आवारात असलेल्या प्रत्येक गोण्यांचे वजन केल्यास गव्हाचा एकूण साठा १३१६० क्विंटल पेक्षा कमी आढळून आला असता असे सांगितले.

तथापी, अधिकाऱ्यांनी घटनास्थळी मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा.लि. चे व्यवस्थापक रामप्रकाश विजयप्रकाश विजयवर्गीय यांचेसमक्ष फ्लोअर मिलमधील गव्हाच्या साठयाची पाहणी करुन प्रत्यक्ष मोजदाद केली असता एकूण १३१६० क्विंटल गव्हाचा प्रत्यक्ष साठा आढळून आला व तसा उपस्थित व्यवस्थापक यांनी सादर केलेल्या लेखी जबाबात कबुल केले आहे. म्हणजेच मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा.लि. यांच्या तपासणीमधील १६५० क्विंटल गव्हाचा अतिरिक्त साठा आढळून आल्याने त्यांनी दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ या आदेश तसेच त्याअन्वये त्यांना देण्यात आलेल्या परवान्यामधील अटी व शर्तीचे तसेच पर्यायाने त्यांनी जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चा भंग केल्याचे सिध्द होत आहे.

मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा.लि. यांनी सादर केलेल्या खुलाशात कंपनीमध्ये उत्पादनाच्या वेळी होणाऱ्या प्रक्रियेत (Processing) गव्हाच्या साठ्याचे वजन दीड टक्का वाढत असल्याचे नमूद करुन या नुसार गव्हाच्या साठ्याची बेरीज केली तर पुस्तकी शिल्लक व प्रत्यक्ष शिल्लक यामध्ये फरक आढळून येणार नसल्याचे नमूद करुन सदर गव्हाचा साठा १३१६० क्विंटल ऐवजी ११५१० क्विंटल गव्हाचा साठा आढळून येईल असे नमूद केले आहे. तसेच दीड टक्का वाढीव वजनाचे साठा पुस्तकात नोंद घेतल्याचे नमूद केले आहे. याप्रकारे साठापुस्तकात नोंद असलेला साठा व प्रत्यक्षात असलेला साठा यामध्ये फरक नसल्याचे सांगुन, जीआर क्र. ८८० ई दि.३०/०३/२००९

अन्वये केंद्र तसेच राज्य शासनाने गव्हावरचे निर्बंध काढले असल्याचे सांगून सदर साठ्याच्या व्यवहाराशी संबंधित तसेच मिलिंगकरिता परवान्याची आवश्यकता नसल्याने परवान्याच्या अटींचे पालन करण्याचा प्रश्न उद्‌भवत नसल्याचे सांगितले.

तथापी, मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा.लि. यांनी निवेदना सोबत कन्सेप्ट्स या फ्लोअर मिलच्या टेक्नीकल कन्सल्टन्स संस्थेचे सादर केलेल्या अभिप्रायाचे अवलोकन केले असता, गव्हाच्या दळण प्रक्रीयेमध्ये refraction loss, water addition and evaporation losses यामुळे दळणानंतर अंतीम उत्पादित साठ्याचे वजन वाढण्याची शक्यता असल्याबाबत नमूद केले आहे. तसेच मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा.लि. यांच्या साठा पुस्तकाच्या छायांकित प्रतींचे अवलोकन केले असता, त्यांनी मिलिंग करिता गहू पाठविल्यानंतर उर्वरित शिल्लक असलेल्या गव्हाच्या साठ्यामध्ये महिना अखेरीस Moisture Gain म्हणून अखेर शिल्लक असलेल्या गव्हाच्या साठ्यामध्ये कृत्रिम वाढ दर्शविली आहे. दि महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटिज होलसेल डिलर्स लायसन्सींग ऑर्डर १९९८ अन्वये त्यांना देण्यात आलेल्या परवान्यांच्या अटी/शर्तीमध्ये कोठेही Moisture Gain मुळे गव्हाच्या साठ्यामध्ये होणाऱ्या वाढीबाबत तरतुद नाही. अथवा त्यास मान्यता दिलेली नाही. सबब, मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा.लि. यांनी गव्हाच्या साठ्यामध्ये जाणून बूजून गैरहेतूने वाढ दर्शवून शासनाचे दिशाभूल केलेले आहे.

मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा.लि. यांच्या विरोधात यापूर्वी या कार्यालयाच्या फिरते पथका मार्फत रबाळे पोलिस स्टेशन, नवी मुंबई, ठाणे येथे दिनांक ०८/०४/२००८ रोजी गुन्हा नोंद क्र. II-६०/२००८ तसेच दिनांक १८/०६/२०११ रोजी गुन्हा नोंद क्र. ३०२२/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन कारवाई करण्यात आलेली आहे. यावरुन मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा.लि. चे मालक हे जाणिवपूर्वक व स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी शासन नियंत्रित गव्हाचा गैरव्यवहार करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

केंद्रशासनाने दिनांक १५/०२/२००२ रोजी निर्गमित केलेले आदेश क्र.जी.एस.आर.१०४(ई) अन्वये **"Removal of (Licencing Requirements, Stock Limits and Movement Restrictions) on specified Foodstuffs Order, २००२ "** गहू, तांदूळ, कडधान्य, साखर, खाद्यतेल इत्यादी अनुसुचित वस्तुंवरील निर्बंध पुर्णपणे काढण्यात आले, तथापी सदर आदेशामधील कलम ६ अन्वये **Nothing contained in this Order shall affect the operation of the Public Distribution System (Control) Order, २००१ issued by the Central Government and orders of the State**

**Governments issued in pursuance thereof.** म्हणजेच सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत होणाऱ्या अनुदानीत शिधाजिन्नसांसाठी हे लागु राहणार नसल्याचे नमूद केले आहे.

केंद्र शासनाने अधिसुचना क्र. एस.ओ. १३७३ (ई) दि.२९/०८/२००६ अन्वये गहू व डाळीच्या संदर्भात पुढील ६ महिन्याच्या कालावधीसाठी निर्बंध आणले होते. तद्नंतर अधिसुचनेद्वारे वेळोवेळी मुदतवाढ देऊन दिनांक ३० मार्च, २००९ च्या अधिसुचनाद्वारे दि.१ एप्रिल, २००९ पासून गव्हावरील निर्बंध काढण्यात आले आहे.

तथापी, खुल्या बाजारातील गव्हावरील निर्बंध काढण्यात आले असले तरी सदर अनुसुचित वस्तु म्हणून रास्तभाव दुकानातुन त्याचे अनुदानीत दराने वितरण केले जाते. त्यामुळे घटनास्थळी जप्त करण्यात आलेला १६५० क्विंटल गव्हाच्या साठ्याचे खरेदीबिले सादर न केल्याने तसेच सदरच्या अतिरीक्त साठ्याचे साठापुस्तकात नोंद न घेणे अथवा साठापुस्तकातील नमुद गव्हाचा शिल्लक साठा व प्रत्यक्षात मोजदाद करुन आढळून आलेला साठा यामध्ये बरीच तफावत आढळून आल्याने तसेच तपासणीमध्ये मिलच्या आवारात काही गव्हाच्या गोण्या खाली करुन त्या रिकाम्या गोण्या पलटी करुन पाहिल्या असत्या, त्यावर भारतीय खाद्य निगम असा शिक्का असलेला आढळल्यां. तथापी, याबाबत त्यांनी कोणताही खुलासा केलेला नाही. त्यामुळे सदरचा साठा हा सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे नियंत्रित दराने पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत होणारा गहु असल्याबाबतची साशंकता निर्माण होते. सबब, मे. मेरिडियन फ्लोअर मिल यांचेकडील अतिरीक्त आढळलेला १६५० क्विंटल गव्हाचा विना खरेदीबिलांचा साठा हा गैरमार्गाने मिळविला असल्याचे स्पष्ट होत असून मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये खालील आदेश देत आहे.

<u>आदेश :-</u>

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण १६५० क्विंटल गव्हाचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेला सदर गव्हाचा साठा उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरिता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) उपरोक्त कार्यवाही करतांना उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांनी उपरोक्त गव्हाचा साठा संबंधित अधिकृत शिधावाटप दुकानांच्या पुढील महिन्याच्या नियतनामध्ये दर्शविण्यात यावा.

0010

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावून येणारी रक्कम, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,
मे. मेरिडियन फ्लोअर मिल प्रा. लि. चे मालक
प्लॉट नं. ४९, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया,
रबाळे, नवी मुंबई
(उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे मार्फत)

---

प्रत,

१) उपनियंत्रक शिधावाटप, फ-परिमंडळ, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, परवाना शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.